# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### शासकीय रुग्णालयातील रुग्णवाहिका खाजगी रुग्णालयात ने-आण करण्याकरिता उपलब्ध करण्याबाबत

**(१) १९७३९ (१४-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय रुग्णालयात तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्णांना खाजगी रुग्णालयात घेऊन जावे लागते तेव्हा त्यांना रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्याने गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांची होणारी गैरसोय पाहता सदरहू शासकीय रुग्णालयातील रुग्णवाहिका खाजगी रुग्णालयात ने-आण करण्याकरिता उपलब्ध करण्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०८-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

अशा प्रकारची कोणतीही घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच खाजगी रुग्णालयात रुग्णांना ने-आण करण्याबाबत शासनाचे धोरण नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### ऑनलाईन अपंग प्रमाणपत्रावर सर्व प्रकारच्या अपंगत्वाचे बोधचिन्ह मुद्रीत करण्याबाबत

**(२) २०४२९ (३०-०७-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑनलाईन अपंग प्रमाणपत्रावर सर्व प्रकारच्या अपंगत्वाचे बोधचिन्ह मुद्रित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी शासनाकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) सदर पत्र अप्राप्त आहे.
(२) राज्यात ३ डिसेंबर २०१२ पासून संगणीकीकृत अपंगाचे प्रमाण निर्गमित करण्यात येत आहे. या प्रमाणपत्रावर जे बोधचिन्ह वापरण्यात यते. ते International symbol of access या संस्थेचा असून त्यास जागतिक आरोग्य संघटनेची मान्यता आहे. या बोधचिन्हाच्या खाली प्रमाणपत्रावर राज्य शासनाचा गोपनीय क्रमांक वापरण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जलयुक्त शिवार अभियानामध्ये जालना व इतर जिल्हयात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३) २१९१५ (१४-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने हाती घेतलेल्या महत्वाकाक्षी जलयुक्त शिवार अभियानामध्ये जालना व इतर जिल्हयात गैरव्यवहार झाल्याची बाब माहे मे, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गैरव्यवहार नियंत्रित करणे व सदर अभियान वेळेत पूर्ण व्हावे यासाठी विभागीय कृषी सहसंचालकांना साप्ताहीक प्रगती अहवाल शासनास सादर करण्याचे आदेश देण्यात आले परंतु त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले व अहवाल सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलयुक्त शिवार अभियान पूर्ण करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत गावांची निवड जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने करण्यात येते. सदर अभियानांतर्गत कामांचे कालबध्द नियोजन करण्यात आले असून जिल्हास्तरावरुन संनियंत्रण करुन नियोजनानुसार कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्यात येत असून झालेल्या कामांची तपासणी वेळोवेळी पथकांकडून करण्यात येत आहे.

जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये अनुक्रमे रु.१६०० कोटी व रु.१०००.०० कोटी विशेष निधी वितरित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील नगर तालुक्यातील सारोळाबदी येथे जलयुक्त शिवार अभियानातून सुरु असलेल्या कामात अनियमितता झाल्याबाबत**

**(४) २२३९५ (१४-०८-२०१५). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील नगर तालुक्यातील सारोळाबदी येथे जलयुक्त शिवार अभियानातून सुरु असलेल्या कामात अनियमितता असलेल्या कामाची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी एका निवेदनाद्वारे माहे मार्च, २०१५ च्या शेवट्च्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामस्थांची मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करीत आहे,
(३) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.
तथापि, श्री.तापकिरे रा.वाळकी यांनी जलयुक्त शिवार अभियानातील कामांची चौकशी करण्याची मागणी केली होती. तसेच मा.विधानसभा सदस्य, राहूरी यांनी तालुका कृषि अधिकारी, अहमदनगर यांच्या कार्यपध्दतीबाबत चौकशी करावी असे निवेदन शासनास दिले आहे.
(२) श्री.तापकिरे यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तालुका कृषि अधिकारी, अहमदनगर यांनी चौकशी केली असता सदर काम जमीन मालकाने स्वखर्चाने केले असल्याचे आढळून आले आहे.
तसेच मा.विधानसभा सदस्य, यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दक्षता पथकामार्फत चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार सारोळा बद्दी येथील कपार्टमेंट बंडींग कामाच्या तपासणीमध्ये मातीकाम परिमाणामध्ये तफावत आढळून आली आहे. सदर प्रकरणी संबंधीतावर वसूलीची रक्कम निश्चित करण्यात आली असून कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत.
संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे अभिवेदने प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही कार्यान्वित असून अभिवेदने प्राप्त झाल्यावर प्रशासकिय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, उपरोक्त प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील परिच्छेद ३.१० नूसार जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल), १९७९ अन्वये कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रामटेक उपविभागांतर्गत (जि.नागपूर) रामटेक तालुक्यात प्रस्तावित करण्यात आलेल्या जलसंवर्धनाच्या विकास कामांबाबत**

**(५) २३०९६ (१७-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक उपविभागांतर्गत (जि.नागपूर) रामटेक तालुक्यातील २० व पारशिवनी तालुक्यातील १३ गावांमध्ये सुमारे १ कोटी ५० लाख रुपयांची जलसंवर्धनाची विकास कामे माहे मे, २०१५ च्या सुमारास प्रस्तावित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामांना सुरुवात करण्यात आली आहे काय व किती कामे पुर्णत्वास गेली आहे,

(३) असल्यास, उवर्रीत कामे किती कालावधीत पूर्ण होणार आहे काय ?

**प्रा. राम शिंदे (०५-०८-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पारशिवनी व रामटेक तालुक्यात १५.७९ कोटी रुपयांची अनुक्रमे ९५ व ६१७ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

(२) होय.

रामटेक तालुक्यातील १६५ व पारशिवणी तालुक्यातील १७ जलसंवर्धनाची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(३) उर्वरित कामे मार्च २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

**पुणे जिल्हा-राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन ग्रामीण रुग्णालयात सुविधा पुरविण्याबाबत**

**(६) २४२६३ (१७-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा-राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन या योजनेला १० वर्ष पुर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण सरकारी रुग्णालयांची स्थितीचा आढावा घेण्यासाठी पुणे, ठाणे, रायगड, बीड, औरंगाबाद, सोलापुर या ६ जिल्ह्यामध्ये पाहणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टर कर्मचारी नियमित वेळेवर उपस्थित रहात नसल्याची तक्रारी ग्रामस्थांकडून जनसुनवाईमध्ये करण्यात आल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉक्टर, नर्स, आरोग्य सेवकांची अपुरी संख्या, तसेच त्यांच्यासोबत केलेल्या करारांचे नुतनीकरण व वेतन वेळेवर अदा करण्यात येत नसल्यामुळे कामावर यांचा परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र येथे डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांना निवासस्थाने, पाणी, वीज या मुलभूत सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने महत्वपुर्ण निर्णय घेतला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०८-२०१६) :** (१) व (२) अंशत: हे खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत सेवांवर लोकाधारीत देखरेख व नियंत्रण प्रकल्पातील कार्यरत राज्य समन्वय संस्थेमार्फत आरोग्य यात्रा या नावाने मोहिम राबविण्यात आली होती. सदर मोहीमेत समाविष्ट असलेल्या पुणे, ठाणे, रायगड, बीड, औरंगाबाद व सोलापूर या सहा जिल्ह्यात गाव, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर मिळणाऱ्या एकूण १५ प्राथमिक व महत्वाच्या आरोग्य सेवांच्या हमी संदर्भात विश्लेषण करुन लोकसमुहात संवाद साधण्यात आला. त्यावेळी वैद्यकीय अधिकारी वेळेवर उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी करण्यात आल्या.

(३) अंशत: खरे आहे.

संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर बायोमेट्रीक हजेरी प्रणाली उपलब्ध करुन देण्यात आलेली असून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची हजेरी बायोमेट्रीक हजेरी प्रणालीत नोंद ठेवण्यात येते. ज्या ठिकाणी नियममित वैद्यकीय अधिकारी, ए एन एम यांची पदे रिक्त आहेत त्या ठिकाणी भारतीय सार्वजनिक आरोग्य मानंकानुसार कंत्राटी स्वरुपात सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या करारांचे नूतनीकरण वेळेवर करण्यात येत असून त्यांचे वेतन दरमहा १ तारखेला ECS द्वारे नियमित अदा करण्यात येते.

(४) ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र येथे डॉक्टर्स व स्टाफला निवासी राहण्यासाठी ज्या ठिकाणी निवासी संकुल बांधण्यात आले आहे. तेथील ज्या निवासस्थानांना पाणी व वीज या सुविधा उपलब्ध नाहीत त्या ठिकाणी पाणी, विज या मूलभूत सुविधा उपलब्ध होण्यासाठी दुरुस्तीची कामे सुरु करण्यात आली आहेत. त्याच प्रमाणे निवासी संकुल नसलेल्या ठिकाणी निवासी संकुल बांधण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

### किनवट येथील (जि.नांदेड) लघु सिंचन (जल) उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील मेंडकी येथील मजूरांना १२ वर्षापासून मजूरी मिळालेली नसल्याबाबत

**(७) २६७८५ (१७-०८-२०१५). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट येथील (जि.नांदेड) लघु सिंचन (जल) उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील मेंडकी येथील पाझर तलावाच्या निर्माण कार्यानंतर रोहयो अंतर्गत मजूरांनी केलेल्या कामाची मजूरी १२ वर्षापासून मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मजूरांना १२ वर्षानंरतही मजूरी न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या मजूरांना तातडीने त्यांची मजूर देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच यात दोषी असलेल्या शाखा अभियंत्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ते (५) या प्रकरणी जिल्हाधिकारी, नांदेड कार्यालयाने तात्काळ पतमर्यादा मागणी केली नाही.

या प्रकरणी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त करुन दि.२०.२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी, नांदेड यांना रु.७४,६००/- इतकी अकुशल पतमर्यादा मंजूर करण्यात आली व सदर रक्कम त्यांच्याकडे बीडीएसद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालय व संबंधित यंत्रणेने यापैकी रुपये ४९,०४६/- इतकी रक्कम संबंधित मंजूरांच्या बँक खात्यावर जमा केली आहे, तर काही मंजूर मयत/स्थलांतरित झाल्यामुळे त्यांची रु.२५,५५४/- इतकी मंजूरी अदा करण्यात आली नाही. सदर रक्कम जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनास समर्पित करण्यात आली आहे. या प्रकरणी कोणावरही जबाबदारी निश्चित केलेली नाही.

---

## जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सुरु असलेल्या कामाचा आढावा व पहाणी करण्यासाठी नोडल अधिकारी नेमण्याबाबत

**(८) २७४९८ (१७-०८-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सुरु असलेल्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात निकृष्ट दर्जाचे काम झाल्यास तसेच बंधाऱ्यात गळती सापडल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्याचा इशारा जिल्हाधिकारी, सातारा यांनी दिला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, योजनेअंतर्गत कामाचा आढावा घेण्यासाठी व पाहणी करण्यासाठी ५ गावांमध्ये एक नोडल अधिकारी नेमण्याबाबत तसेच निकृष्ट दर्जाचे काम आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कृषी संबंधित कामांची तपासणी करण्यासाठी कृषी पर्यवेक्षक व कृषी मंडळ अधिकारी आणि जलसंवर्धन व जलसंधारणाची कामे तपासणीसाठी

कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / उपअभियंता यांची निवड करण्यात आली आहे. तसेच कामांची तपासणी करण्यासाठी १० त्रयस्थ संस्थांची निवड करण्यात आली आहे. त्रयस्थ संस्थेमार्फत आतापर्यंत ५५०९ कामांची तपासणी करण्यात आली आहे.

उपरोक्त नमूद केलेल्या त्रयस्था संस्थांची जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामांच्या तपासणीसाठी नेमणूक केल्यामुळे कामे चांगल्या प्रगतीची होण्यास मदत झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय, हिंगणघाट यांच्याविरुद्ध तक्रारींमध्ये वाढ होवूनही शासन कारवाई करीत नसल्याबाबत**

**(९) २८८७८ (२१-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय हिंगण घाट यांच्या विरुद्ध तक्रारींमध्ये वाढ होवूनही शासन कारवाई करीत नसल्याने आंदोलन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासनास इशारा दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१२-०८-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७.०५.२०१५ अन्वये दिलेला तक्रार अर्ज प्राप्त झालेला आहे.

(२) तक्रारीच्या अनुषंगाने डॉ.अनिरुध्द देशपांडे, साथरोग शास्त्रज्ञ, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नागपूर व डॉ.पी.डी.मडावी, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, वर्धा यांच्या व्दिसदस्य समितीने चौकशी केली असून डॉ.देशमुख हे मुख्यालयी राहत नसल्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अचलपूर जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या इमारत बांधकामाबाबत**

**(१०) २८९०६ (२१-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर उपजिल्हा रुग्णालयाच्या श्रेणी वर्धित करून जिल्हा सामान्य रुग्णालयाचा दर्जा देवून कुटीर रुग्णालय परतवाडा या इमारतीमध्ये स्त्री रुग्णालय सुरु करणे तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या इमारत बांधकाम याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी शासनाकडे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ५ ऑगस्ट, २०१५ रोजी शासनाचे अवर सचिव आरोग्य विभाग यांनी आरोग्य संचालक महाराष्ट्र यांचेकडे स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संचालक आरोग्य संचालनालय यांचेकडून शासनास अभिप्राय प्राप्त झाले आहेत काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय.
(४) शासन स्तरावर सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत सुधारित बृहत आराखडा करण्याची कार्यवाही सुरु आहे. निकषानुसार पात्र ठरल्यास सदर संस्था सुधारित बृहत आराखड्यामध्ये समावेश करण्याची बाब तपासून घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागातील पावती पुस्तके गहाळ झाल्याबाबत

**(११) २८९६२ (२०-०१-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागाकडून टेंडर फी जमा करण्यासाठी नोंद केलेली ४६ पावती पुस्तके गहाळ झाल्याचे प्रकरण माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) सर्व पावती पुस्तके उपलब्ध असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

### जळगांव जिल्हयात झाडांवर डिंकाचे प्रमाण वाढविण्यासाठी इथरेक या रासायनिक द्रव्याचा वापर केला जात असल्याबाबत

**(१२) ३५५७८ (१३-०१-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात झाडांवर डिंकाचे प्रमाण वाढविण्यासाठी इथरेक या रासायनिक द्रव्याचा वापर केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इथरेकच्या वापरामुळे खैरे व धावडा जातीचे झाडे सातपुडयातून नामशेष होतील तसेच इथेपॉन हा घटक ३९ टक्के असल्यामुळे कॅन्सर होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, इथरेकच्या वापरावर निर्बंध आणण्यासाठी स्थानिक वन अधिकारी व कर्मचारी दुर्लक्षित करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दोषी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सदर झाडांवर इथेरिकच्या वापरामुळे दुष्परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच कॅन्सर होण्याची शक्यता ही बाबही निदर्शनास आलेली नाही. तथापि यासंदर्भात शास्त्रीय अहवाल प्राप्त करुन घेण्यात येत आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया येथील केटीएस शासकीय रुग्णालयात वेळीच**
**उपचार न झाल्याने रुग्णाचा झालेला मृत्यू**

**(१३) ३५६०१ (२१-०१-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया येथील केटीएस शासकीय रुग्णालयात श्री.भागवत रिनायत या रुग्णाला वेळीच उपचार न मिळाल्याने मृत्यु झाल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू घटनेची चौकशी करण्यात येऊन दोषींविरुध काय कारवाई करण्यात आली,
(३) असल्यास, सुविधा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही. श्री.भागवत रिनायत या रुग्णावर सर्वप्रथम एप्रिल, २०१२ मध्ये राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कॅट-१ हा ६ महिन्याचा संपूर्ण उपचार करण्यात आला होता त्यात तो क्षयरोगमुक्त झालेला होता. तथापि, सप्टेंबर, २०१४ मध्ये परत क्षयरोग उद्‌भवल्यामुळे कॅट-२ ही ८ महिन्याची उपचारपध्दती सुरु करण्यात आली. त्यावेळी आय.पी.च्या ३६ पैकी २५ औषधीचे डोस रुग्णाने घेतले. त्यानंतर औषधी डोस घेण्यास नकार दिला. आरोग्य संस्थेतील आरोग्य कर्मचाऱ्यांनी वारंवार गृहभेट देवुनही रुग्ण उपचार घेण्यास तयार झाला नाही. तसेच रुग्णाच्या नातेवाईकाकडे चौकशी केली असता खाजगी

वैद्यकीय व्यवसायीकडे औषधोपचार सुरु असल्याचे कळले होते. त्यामुळे शासकीय रुग्णालयातील भोंगळ कारभारामुळे वेळीच उपचार न झाल्याने रुग्णाचा मृत्यू झाला असे म्हणता येत नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाण्याचा अभाव असल्याबाबत**

**(१४) ३६७३५ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाण्याचा अभाव असल्यामुळे रुग्णांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयात वाघूरचा पाणी पुरवठा होतो मात्र, गेल्या चार दिवसांपासून वाघूरचा पाणी पुरवठा बंद असून याकडे जिल्हा रुग्णालय प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे वा करीत आहे,
(४) अद्यापपर्यंत कारवाई केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही. उन्हाळ्याच्या दिवसात वाघुरचा पिण्याच्या पाणी पुरवठ्याचा अभाव असला तरी जिल्हा सामान्य रुग्णालयातील एकूण ४ कुपनलिका विहिरींमार्फत रुग्णालयातील पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना इतरत्र भटकंती करावी लागत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे मावसाळा (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) शिवारातील**
**रंग महल तलावाची झालेली दुरवस्था**

**(१५) ३८८०५ (१२-०१-२०१६). श्री.सुरुपसिंग नाईक (नवापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मावसाळा (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) गावाच्या शिवारात असलेल्या ऐतिहासीक व उत्कृष्ट बांधकाम शैलीच्या नुमना असलेल्या रंग महल तलावाची दुरवस्था झाली असून हा तलाव नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तलावाचे संवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सन १९७२ च्या दुष्काळामध्ये या तलावातील गाळाचा उपसा काढण्यात आला. तद्नंतर सन २००३-०४ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी निर्देश देवून मोठ्या प्रमाणात गाळ काढून पाणी साठविण्याची व्याप्ती वाढविली होती. एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ मध्येही जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिल कार्यालय खुलताबाद यांच्या वतीने लोकसहभागातून गाळ काढण्याचा उपक्रम हाती घेवून त्यातून ६५ ते ७० हजार ब्रास गाळाचा उपसा करण्यात येवून ऐतिहासीक घाटाची स्वच्छता मोहिम राबवून घाट स्वच्छ करण्यात आला. या तलावाची मालकी कोणत्याच खात्याकडे नसल्याने जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेमार्फत आर्कालॉजीकल सर्व्हे ऑफ इंडीया व राज्य पुरातत्व विभाग यांच्याकडे सदर तलावाच्या हस्तांतरणाच्या प्रस्तावाची कार्यवाही तहसिल कार्यालय खुलताबाद स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्हयातील आरोग्य विभागातील विविध ११८ पदे रिक्त असल्याबाबत**

**(१६) ३९५९७ (२१-०१-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयातील आरोग्य विभागात जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात एकूण २१८ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच जिल्हयात एकूण मंजूर पदे ५४५ आहेत व त्यापैकी २१८ पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांना वैद्यकीय सेवा वेळेवर मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड जिल्हयातील आरोग्य विभागातील २१८ रिक्त पदे भरण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०८-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय येथे गट-अ ते गट-ड मध्ये एकूण ११६६ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ९५२ पदे भरलेली असून २१४ पदे रिक्त आहेत.

तथापि, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत एकूण १६ वैद्यकीय अधिकाऱ्यांमधील विशेषज्ञाची पदे व विविध पॅथीच्या (आयुर्वेद, युनानी, होमीओपॅथी) आयुष कार्यक्रमांतर्गत एकूण २७ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे कंत्राटी पदध्दतीने भरलेली असून यांचेमार्फत रुग्णांना आरोग्य सेवा वेळेवर देण्यात येते.
(३) गट-अ व गट-ब ची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड ची पदे विभागीय स्तरावर भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**आंबा (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मनमानी कारभारबाबत**

**(१७) ३९९२४ (१०-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबा (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मनमानी कारभार चालू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात अस्वच्छता, गैरहजर कर्मचारी, रिक्त पदे, औषध पुरवठा व सेवेतील हेळसांडपणा तसेच प्रसूती गृहात साप आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांनी धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(४) तसेच सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात शिपाई किवा रखवालदार नसल्याने येथील विजेचे फिटिंग व फर्निचर चोरीला गेले तसेच सदर जागेचा दुष्कृत्यासाठी वापर होऊ लागला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास शासनाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रात एक कंत्राटी स्वीपर कार्यरत असून त्याचेमार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रातील स्वच्छता नियमित केली जात आहे. एक वैद्यकीय अधिकारी पदव्युत्तर प्रशिक्षणास गेल्यामुळे सदर ठिकाणचा अतिरिक्त कार्यभार अन्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे सोपविणेत आलेला होता. प्राथमिक आरोग्य केंद्र आंबा हे वनपरिक्षेत्रामध्ये येत असल्यामुळे सदर ठिकाणी सापांचे प्रमाण जास्त आहे. प्रसूतीगृहामध्ये साप आढळून आला होता, ही बाब खरी आहे.

(३) हे खरे आहे.

माहे नोव्हेंबर, २०१५ पूर्वी एक वैद्यकीय अधिकारी पद रिक्त व एक वैद्यकीय अधिकारी पदव्युत्तर शिक्षणाकरीता गेल्यामुळे सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ यांनी धरणे आंदोलन केले होते. त्या कालावधीत सदर ठिकाणचा अतिरिक्त कार्यभार अन्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे सोपविणेत आलेला होता.

(४) हे खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत आरोग्य विभागाच्या ताब्यात मिळण्यापूर्वी त्या ठिकाणी रखवालदार व परिचर नसल्यामुळे फिटींग व फर्निचर चोरीला गेले होते.

(५) प्रसूती गृहात साप निघाल्यामुळे व ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देवून दक्षता पूर्वक कामकाज करणेच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. येथील वैद्यकीय अधिकारी पद हे माहे, नोव्हेंबर २०१५ रोजी भरल्याने प्राथमिक आरौग्य केंद्राची कामकाज सद्य:स्थिती सुरळीतपणे सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सादुरे (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम रखडल्याबाबत**

**(१८) ४००७२ (१०-०५-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सादुरे (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम रखडल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतीचे काम विनाविलंब सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयातील वैभववाडी तालुक्यातील सादूरे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर नाही. यास्तव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या बांधकामाचा प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, वैभववाडी येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर झालेले असल्याने, तेथील कार्यान्वित असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र हे वैभववाडी तालुक्यातील सादुरे या गावांत स्थलांतरीत करणेबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निलंगा (ता.लातूर) उपजिल्हा रूग्णालयात उपचाराअभावी वृध्द महिलेचा मृत्यू झाल्याबाबत**

**(१९) ४००८० (१०-०५-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयातील निलंगा तालुक्यातील वृध्द महिला लतिकाबाई अंबाजी वाघमारे या महिलेचा डॉक्टरांचा निष्काळजीपणामुळे मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्तबाबत सुमारे ३ तासापेक्षा जास्त वेळ एकही डॉक्टरांनी रूग्णाची दखल न घेतल्याने सदर महिलेचा उपचाराअभावी मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, निष्काळजी करणाऱ्या निवासी वैद्यकिय अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) एक महिला रुग्ण ही दि. २५.१२.२०१५ रोजी दु. १.३५ वा उपजिल्हा रुग्णालय, निलंगा येथे दाखल होण्यापूर्वी मेंदूज्वराने ५ ते ६ दिवसापासून आजारी होती. रुग्णालयात फिजिशियन तज्ञ नसल्याने तिला संदर्भित करण्यासाठी लेखी कळविले तथापि, रुग्णाच्या नातेवाईकांनी जाण्यास नकार दिला.

रुग्ण महिला ही वयोवृध्द असल्याने व तिची अवस्था बिकट असल्याने रुग्णाने उपचारास प्रतिसाद दिला नाही त्यामुळे उपचारादरम्यान २० तासानंतर रुग्णाचा मृत्यू झाला आहे.
(३) व (४) रुग्णास उपलब्ध असलेले सर्व उपचार करण्यात आले असल्याने या प्रकरणी वैद्यकीय अधिकारी दोषी आढळून आले नाहीत.

---

**अहमदनगर जिल्हयातील मांडवगण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी राहत नसल्याबाबत**

**(२०) ४०५२९ (१०-०५-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील मांडवगण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी राहत नसल्यामुळे तेथील नागरीकांना रात्रीच्या वेळेस आरोग्य सेवा मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी रुग्णालयाच्या वसाहतीत न राहण्याची कारणे काय आहेत,
(३) तेथील रुग्णांना रात्रीच्या वेळेस आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी तेथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना रात्रीच्या वेळेस रुग्णालयाच्या वसाहतीत राहण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१), (२) व (३) या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशीअंती जी वस्तुस्थिती निदर्शनास येईल त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**नाशिक जिल्ह्यातील जलयुक्त अभियानची कामे अनुदानाअभावी मूळ आराखड्यानुसार होणार नसल्याबाबत**

**(२१) ४०८२३ (२९-०४-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलयुक्त अभियान राबविण्यासाठी नाशिक जिल्ह्याचा ३१०.४९ कोटींचा आराखडा असतांनाही सर्व यंत्रणांकडून ६४.४३ कोटी रुपयेच निधी उपलब्ध होणार असल्यामुळे रू. १२४.७३ कोटी रकमेच्या तफावतीमुळे सदर अभियानातील कामे मूळ आराखड्यानुसार होणार नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभियानाकरीता जिल्ह्याला अतिरिक्त १०० कोटींच्या निधीची गरज असून त्याबाबत जिल्हा प्रशासनाने माहे जानेवारी २०१६ मध्ये शासनास प्रस्ताव पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील जलयुक्त अभियानाकरिता यंत्रणांकडील नियमित अनुदानाव्यतिरिक्त फक्त ५०.४३ कोटी निधी मंजूर आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जलयुक्त अभियानासाठी मूळ आराखड्यानुसार अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (०५-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवड करण्यात आलेल्या गावांचा रु.२६५.७० कोटी रुपयांचा सुधारित आराखडा तयार करण्यात आला असून विविध योजनेंतर्गत रु.१७३.७३ कोटी निधी उपलब्ध आहे. आराखड्यातील कामे पूर्ण करण्यासाठी रु.२६.५६ कोटी अतिरिक्त निधी शासनाने उपलब्ध करुन दिला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

नाशिक जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामांसाठी विविध स्त्रोतांमधून सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये अनुक्रमे रु.१७३.१५ कोटी व २६.७३ कोटी अनुदान प्राप्त झालेले आहे.

(४) सन २०१५-१६ करिता शासनाने नियमित अनुदानाव्यतिरिक्त रु.६१.०९ कोटी जलयक्त विशेष निधी उपलब्ध करुन दिला आहे.

---

### येऊर (जि. ठाणे) परिसराचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याबाबत

**(२२) ४१९२४ (२०-०५-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ठाणे, पुणे, अमरावती, चंद्रपूर, औरंगाबाद, यवतमाळ, धुळे व नागपूर वनवृत्तातील पर्यटन स्थळांचा विकास करण्याच्या प्रस्तावाची अंमलबजावणी शासनस्तरावर केली जात असून दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास आवश्यक निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार ठाणे येथील येऊर परिसराचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे. सन २०१५ - १६ या आर्थिक वर्षात निसर्ग पर्यटन योजनांतर्गत राज्यभरात विविध वनवृत्ताकरीता रु. ९१३५.०६ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) ठाणे येऊर परिसराचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याच्या दृष्टीने येऊन ठाणे येथील आदिवासी माहिती केंद्र व निसर्ग उद्यान आणि पाटीलपाडा घोडबंदर रोड येथील वनजमिनीवर निसर्ग उद्यान उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणी ठाणे महानगरपलिकेचे वास्तुविशारद यांनी वनअधिनियमांचा भंग न करणारी कामे समाविष्ट करुन प्रस्ताव वनविभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास कळविण्यात आले आहे. तसेच प्रशान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर व ठाणे महानगरपालिकाआयुक्त यांचे कार्यालयामध्ये दिनांक १८.०५.२०१६ रोजी बैठक आयोजित करुन उपरोक्त कामांना गती मिळण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली आहे. मुख्य वनसंरक्षक संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनी दिनांक २३.०६.२०१६ रोजी ठाणे महानगरपालकिचे कार्यकारी अभियंता यांचा समवेत उक्त प्रकरणी चर्चा करुन प्रस्ताव लवकरात लवकर सादर करणे कामी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय आरोग्य सेवेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२३) ४२०२९ (१०-०५-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासकीय आरोग्य सेवेतील वरिष्ठ अधिकारी, विशेषज्ञ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची सुमारे ३ हजारे ५७२ पदे रिक्त असल्याने गोरगरीब रुग्णांची वैद्यकीय उपचाराअभावी गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०८-२०१६) :** (१) नाही. राज्यातील आरोग्य सेवेमधील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे ५४०० व त्यावरील) मध्ये एकूण ८७५२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६४२८ पदे भरण्यात आलेली असून २३२४ पदे रिक्त आहेत. सदरहू रिक्त पदांपैकी एकूण ७५५ वैद्यकीय अधिकारी, अस्थायी, कंत्राटी व बंधपत्रिक नियुक्तीने रुग्णालयांना सेवा देत आहेत.
(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वर्ग-१) ग्रेड पे ६६०० वरील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच गट - अ ग्रेड पे-५४०० मधील रिक्त पदे स्वतंत्र निवड मंडळामार्फत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यात सन १९७२ साली बांधलेल्या पाझर तलावांची संख्या ४०० असून या पाझर तलावातील गाळ व माती काढून खोलीकरण करण्याबाबत**

**(२४) ४२४०७ (२९-०४-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात सन १९७२ साली बांधलेल्या पाझर तलावांची संख्या ४०० असून या पाझर तलावातील गाळ व माती काढून खोलीकरण करणे गरजेचे झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शासनाने निर्णय घेऊन सदर पाझर तलावातील गाळ व माती काढून खोलीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०३-०८-२०१६) :** (१) होय.

(२) शासनामार्फत जलयुक्त शिवार अभियानातून डिझेलचा पुरवठा करुन लोकसहभागातून गाळ काढणेत येत आहे. आतापर्यंत सातारा जिल्ह्यातील १०८ तलावामधून अंदाजे १२००० ब्रास गाळ काढण्यात आला आहे. तसेच यांत्रिकी विभाग, महाराष्ट्र शासन व ग्रामस्थांचेमार्फत स्वखर्चातून गाळ उचलणेची मोहिम राबविणेत येत आहे.

(३) सदर पाझर तलावातील गाळ काढणेची कार्यवाही टप्प्याटप्याने प्रगतीत असल्याने विलंब झालेला नाही.

---

**जलयुक्त शिवारातील वितरीत केला जाणाऱ्या निधीच्या नियमांना शिथिल करुन नगरपालिकांना या योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला जाणार असल्याबाबत**

**(२५) ४२९३१ (२९-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात सुरु असलेल्या जलयुक्त शिवारात आतापर्यंत ग्रामीण भागाला केंद्रबिंदू मानून निधी वितरीत केला जात होता मात्र यातील नियमांना शिथिल करुन राज्यातील नगरपालिकांना देखील या योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला जाणार असल्याची माहिती राज्याचे मा. महसूलमंत्री यांनी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप कशा प्रकारचे आहे,

(३) असल्यास, सदरची योजना शासन केव्हापासून सुरु करणार आहे त्याचा कालावधी साधारण किती दिवसाचा आहे,

(४) अद्याप, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या नद्या/ओढे यांचे खोलीकरण/रुंदीकरण आणि इतर बाबींचा समावेश करण्यात येईल असे जाहीर केले होते. त्यानुसार शासनाने तत्वता निर्णय घेतला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथील ट्रामा केअर युनिटचे मुख्य इमारत बांधकामासाठी जुनी निवासस्थाने पाडण्याबाबतचा प्रस्ताव**

**(२६) ४३०४९ (१०-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर, (जि.अमरावती) येथील ट्रामा केअर युनिटचे मुख्य इमारत बांधकामासाठी जुनी निवासस्थाने पाडण्याबाबतचा प्रस्तावास मान्यता देणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रस्तावास दिनांक २३/३/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) सामान्य रुग्णालयामध्ये रिक्त पदे व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) ४३५१५ (१०-०५-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) शहर हे मुस्लीम बहुल शहर असून ७० टक्के लोक हे दारिद्र रेषेखाली जीवन जगत असून ते सामान्य रुग्णालय येथे उपचार घेत असतात सदर रुग्णालयांमध्ये तज्ञ डॉक्टर वर्ग व विविध प्रकारची मशिनरी नसल्यामुळे येथील रुग्णांना वेळीच उपचार मिळत नसल्याने मालेगांव येथील सामान्य रुग्णालयामध्ये रिक्त पदे व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(३) नसल्यास, त्याची सविस्तर कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०८-२०१६) :** (१) सामान्य रुग्णालय, मालेगाव जि.नाशिक या रुग्णालयातील रिक्त पदे भरणे, इतर साधनसामुग्री व औषधे पुरविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीचे दि. १७.१२.२०१५ चे निवेदन अप्राप्त आहे. तथापि, त्यांचे दि. ६.१.२०१६ चे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर रुग्णालयासाठी गट-अ ते गट-ड संवर्गातील मंजूर असलेल्या २९९ पदांपैकी १४५ पदे भरलेली असून १५४ पदे रिक्त आहेत या रिक्त पदांपैकी गट-ड मधील कक्षसेवक व स्वच्छकसेवकांची एकूण ७५ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली आहे. तसेच सदर रुग्णालयात पूर्ण वेळ कार्यरत नसलेल्या विशेषज्ञांच्या सेवा राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ऑनकॉल पध्दतीने देण्यात येत आहेत. तसेच सदर रुग्णालयासाठी आवश्यक यंत्र सामुग्री व पुरेसा औषधसाठा उपलब्ध असून त्याद्वारे रुग्णांना सेवा देण्यात येत आहे.
(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे. तसेच गट-क व ड ची रिक्त पदे उपसंचालक, आरोग्य सेवा यांच्या स्तरावर भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किवळ खोडजाईवाडी (ता.कराड, जि.सातारा) लघुपाटबंधारे तलावाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२८) ४३८२२ (३०-०४-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किवळ (खोडजाईवाडी) (ता.कराड, जि.सातारा) या लघुपाटबंधारे तलावाचे अपूर्ण काम पुर्ण करण्याची मागणी प्रधान सचिव, ग्रामविकास यांचेकडे कराड, जि.सातारा येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ जुलै,२०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) होय.
(२) योजनेचे रुपये १२२४.०१ लक्षाचे सुधारित अंदाजपत्रकास व्यय व अग्रक्रम समितीची मान्यता मिळाली असून सुधारित प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर (जिल्हा लातूर) येथील २०० खाटाचे रुग्णालय मंजूर झाल्याबाबत**

**(२९) ४४७३४ (१०-०५-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जिल्हा लातूर) येथील २०० खाटाचे रुग्णालय मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टरांची व इतर कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रिक्त पदे त्वरीत भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.

शासन निर्णय दि. २.२.२००९ अन्वये मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत उदगीर, जि.लातूर येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन विशेष कक्षासह २०० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास तत्वत: मंजूरी देण्यात आलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) उपजिल्हा रुग्णालयाकरीता मंजूर ९६ पदांपैकी ८५ पदे भरण्यात आलेली असून रिक्त ११ पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाची श्रेणीवाढ करुन ५० खाटा करण्याबाबत**

**(३०) ४५३७१ (११-०५-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाची श्रेणीवाढ करुन ५० खाटा करणे व सर्व सोयीसुविधांसह करावे अशी विनंती तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे मा. आरोग्य मंत्री यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०१५ च्या सुमारास केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मा.लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार श्रेणीवर्धनाच्या अनुषंगाने निकषानुसार तपासून प्रस्ताव सादर करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयास सुचित करण्यास आले आहे.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील काकशेवड शिवारातील पांझरानदीवरील कोल्हापूर बंधाऱ्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) ४५५१५ (२९-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री तालुक्यातील काकशेवड पैकी चिंचपाडा येथे पांझरा नदीवर बांधकाम सुरु असलेल्या कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे बांधकाम सुमारे ९० टक्के पूर्ण आहे परंतु उर्वरित १० टक्के काम पूर्ण होत नसल्यामुळे कोटयवधी रुपये खर्च करुन अर्धवट बांधलेल्या बंधाऱ्याचे पाणी शेतकऱ्यांना देता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापि, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) होय.

(२) कार्यक्षेत्रिय परिस्थितीनुसार कामाच्या परिमाणात वाढ झालेली असल्यामुळे सदर कामाचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांनी दिनांक २१/३/२०१६ अन्वये आदिवासी विकास विभागास सादर केला आहे. वार्षिक योजनेतून निधी उपलब्धतेनुसार कामांचे नियोजन करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील जिल्हा परिषद ३४ बंधाऱ्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३२) ४५८२८ (०३-०५-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील जिल्हा परिषद ३४ बंधाऱ्याची कामे ८ वर्षापासून प्रगतीपथावर असताना देयके अदा केली असल्याने लघुपाटबंधारे पश्चिम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना सदरील गैरव्यवहाराची चौकशी करावी असे आदेश जिल्हा परिषदेचे अध्यक्षांनी दिले असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सिंचन गैरव्यवहाराचा अहवाल सादर झाला असल्यास त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### तुरंबे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथे वैद्यकिय पथकांची मागणीबाबत

**(३३) ४६७२५ (११-०५-२०१६). श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुरंबे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथे वैद्यकिय पथकांची मागणी स्थानिक व लोकप्रतिनिधी वारंवार शासनाकडे करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी प्रस्ताव पाठविण्याचे आदेश देऊन सहा महिन्याचा कालावधी लोटूनही अद्यापही प्रस्ताव सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्ताव सादर करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, तातडीने प्रस्ताव दाखल करुन आरोग्य पथक उपलब्ध करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

तुरंबे ता.राधानगरी येथे आरोग्य पथक मंजूर असून आरोग्य पथकाची इमारती दि. १.०२.२००५ पासून कार्यरत आहे. तथापि या आरोग्य पथकाचे रुपांतर प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधीचे दि. २६.०८.२०१५ चे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे. या निवेदनाच्या अनुषंगाने तपासून प्रस्ताव सादर करण्याबाबत संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना सूचित करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपुर वनवृत्त व वनविकास महामंडळात अधिकारी व कर्मचाऱ्यांची तब्बल २०५ पदे रिक्त असल्याबाबत

**(३४) ४७००७ (०७-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपुर वनवृत्त व वनविकास महामंडळात अधिकारी व कर्मचाऱ्यांची तब्बल २०५ पदे रिक्त आहेत त्यामुळे सद्य:स्थितीत एका कर्मचाऱ्याला तब्बल हजारे ते बाराशे हेक्टर वनक्षेत्राची देखभाल करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील वनअधिकारी व कर्मचारी यांच्यावरील कामाचा ताण लक्षात घेता सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०८-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत रिक्त पदे खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १. | वनपरिक्षेत्राधिकारी | १२५ | १२० | ०५ |
| २. | वनपाल | ३०० | १९४ | १०६ |
| ३. | वनरक्षक | ५९८ | ५२४ | ७४ |
| | **एकूण** | **१०२३** | **८३८** | **१८५** |

वन विकास महामंडळातील कार्यरत प्रत्येक वनरक्षकांकडे साधारणत: ९०० ते १००० हेक्टर क्षेत्राची संरक्षणाची कामे सोपविण्यात येत असतात.

(२) शासनाचे निर्देशानुसार ५०% पदे भरण्याची मुभा आहे. वनपाल यांची पदे प्रादेशिक स्तरावरुन पदोन्नतीने भरण्याबाबत वनविकास महामंडळ कार्यालयाद्वारे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ. हाळदवाढवणा (ता.जळकोट, जि.लातुर) पाझर तलावाच्या कामात शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला त्यांना मिळण्याबाबत**

**(३५) ४७८८८ (०३-०५-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००६ मध्ये जि.प.ल.पा.विभाग, लातूर या विभागामार्फत मौ. हाळदवाढवणा, (ता.जळकोट, जि.लातुर) पाझर तलावाचे काम करताना मौ. दापका (राजा) (ता.मुखेड) येथील ५ शेतकऱ्यांची १.७१ आर जमिन कुठलीच नोटीस न देता संपादित करुन पाझर तलाव पुर्ण केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ५ शेतकऱ्यांनी संपादित जमिनीचा मोबदला मिळावा यासाठी सन २००८ पासून पाठपुरावा निवेदने करीत आहेत असे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सतत ८ वर्षे मागणी करुनही संबंधित शेतकऱ्याचा मोबदला न दिला गेल्यामुळे दयावयाच्या व्याजापोटी शासनाचे होणारे नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यात येवुन संबंधितांकडून रक्कम वसुल करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, नोटीस न देता जमिनी संपादित केल्या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली काय व उक्त ५ शेतकऱ्यांना मोबदला देण्यासंबंधीची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०९-२०१६) :** (१) संबंधित शेतकऱ्यांची संमती घेवूनच जमिन संपादित करण्यात आली आहे व तनुसार सदर तलावाचे काम लघु पाटबंधारे/पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांचेमार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे.

(२) होय.

५ शेतकऱ्यांनी खाजगी वाटाघाटी भूधारक तयार असल्याबाबत व मावेजा देण्याबाबत शेतकऱ्यांनी उपविभागीय उप अभियंता, लघु पाटबंधारे उपविभाग, जळकोट यांना दिनांक १६/१०/२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) संबंधित जमिनीचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या कार्यालयास सादर करण्यंत आला होता. परंतु त्यांनी सदर प्रस्ताव खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याबाबत दिनांक २७/७/२०१५ चे पत्रान्वये ल.पा. (पा.पु.) विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांना कळविले होते. त्यानुसार दिनांक ७/१२/२०१५ रोजी प्रस्ताव जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. सबब याबाबत जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) संबंधित शेतकऱ्यांची संमती घेवूनच जमिन संपादित करण्यात आली आहे संबंधित शेतकऱ्याचा मोबदला देण्यासंबंधी उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) लातूर, यांच्याकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता परंतु त्यांनी सदर प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, उदगीर यांच्यामार्फत सादर करण्याबाबत कळविल्यामुळे दिनांक ११/५/२०१६ रोजी उपविभागीय अधिकारी उदगीर यांच्याकडे निधी मागणी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी येथील जिल्हा रुग्णालयात करण्यात आलेली सिटी स्कॅनची व्यवस्था इतरत्र स्थलांतरित करण्यात आल्याबाबत

**(३६) ४८४१५ (११-०५-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील जिल्हा रुग्णालयात करण्यात आलेली सिटी स्कॅनची व्यवस्था इतरत्र स्थलांतरित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच परभणी रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना पूर्णक्षमतेने आरोग्य सेवा मिळावी म्हणून स्थलांतरित केलेली सिटी स्कॅनची व्यवस्था जिल्हा रुग्णालयात पुन्हा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, परभणी येथील दहा वर्षे जुन्या सी.टी.स्कॅन मशीनचे आर्युमान संपल्याने व ती वारंवार नादुरुस्त होत असल्याने दि.१९.०३.२०१५ रोजी उपजिल्हा रुग्णालय, मुखेड, जि.नांदेड येथे स्थलांतरीत करण्यात आली आहे. तथापि, अत्यावस्थे, गंभीर व न्यायवैद्यक रुग्णसेवेमध्ये खंड पडू नये म्हणून जिल्हा रुग्णालयाच्या स्तरावरुन रुग्ण कल्याण समितीच्या उपलब्ध निधीतून, तसेच राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांची आवश्यकतेनुसार खाजगी रुग्णालयामार्फत सी.टी.स्कॅन करण्यात आलेले आहे.

(२) विधी व न्याय विभागाच्या दि.१९.०५.२०१६ च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील २६ रुग्णालयांना सी.टी.स्कॅन मशीन व एक्स-रे मशीन खरेदीकरीता श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत असर्थसहाय्य करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा रुगणालय परभणी येथील सी.टी.स्कॅन मशीनच्या समावेश असून खरेदीची विहीत प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बदनापूर (जि.जालना) तालुक्यातील मौ. सागरवाडी, लालवाडी, घाटी सिरसगांव व ढासला या गावातील सिंचन बंधाऱ्यांना दरवाजे नसल्याबाबत**

**(३७) ४८४३४ (२९-०४-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदनापूर (जि.जालना) तालुक्यातील मौ. सागरवाडी, लालवाडी, घाटी सिरसगांव, व ढासला येथील पाच सिमेंट बंधाऱ्यांची कामे होवून दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी होवूनही अद्यापर्यंत दरवाजे बसविण्यात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना जिल्हयात वारंवार दुष्काळी परिस्थती निर्माण होत असतांनाही मात्र विभागाच्या विलंबामुळे शासनाचे लाखो रुपये खर्च झालेले असतांनाही दरवाजे अभावी बंधाऱ्यांमध्ये सिंचन क्षमता निर्माण होवून शकली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळुन आले त्यानूसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे व उक्त प्रकरणातील सर्व बंधाऱ्यांना तातडीने दरवाजे बसविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (०२-०९-२०१६) :** (१) लघु सिंचन (जलसंधारण) विभाग जालना या कार्यालयाने मौ.लालवाडी व ढासला येथे सिमेंट बंधारे किंवा कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधले नाहीत. मौ.सागरवाडी येथे क्र. १ व २ व घाटी सिरसगाव येथे क्र. १ व २ असे एकूण ४ कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, जालना मार्फत बांधण्यात आले आहेत. हे बंधारे सन २०१४ मध्ये पूर्ण करण्यात आले आहेत. तसेच सागरवाढी क्र. १,२ व ३, घाटी सिरसगाव क्र. १ व २ असे एकूण ५ सिमेंट नाला बंधारे बांधण्यात आलेले आहेत ते सन २०१५ मध्ये पूर्ण झालेले आहेत. हे सिमेंअ नाला बंधारे दरवाजा विरहित (non gated) आहेत. बांधण्यात आलेल्या ४ कोल्हापूरी बंधाऱ्यांचे दरवाजे उपलब्ध आहेत. परंतु कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांचे दरवाजे पावसाळा सुरु होण्या अगोदर काढून घेतात व पावसाळा संपल्यानंतर दरवाजे टाकण्यात येताता. मागील दोन वर्षापासून सदरील बंधाऱ्यांच्या क्षेत्रामध्ये कमी पाऊस झाल्यामुळे बंधाऱ्यामध्ये पाणीसाठा झाला नाही व त्यामुळे दरवाजे टाकण्यात आले नाहीत.

(२) मागील दोन वर्षापासून बंधाऱ्याच्या क्षेत्रामध्ये कमी पाऊस झाल्यामुळे दरवाजे टाकण्यात आले नाहीत व त्यामुळे सिंचन क्षमता निर्माण झाली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना येथील जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात मंजूर पदांच्या तुलनेत डॉक्टरांची संख्या अपुरी असल्याबाबत**

**(३८) ४८४३५ (११-०५-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना येथील जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात मंजूर पदांच्या तुलनेत डॉक्टरांची संख्या अपुरी असल्याने गरोदर स्त्रीयांना आरोग्यसेवा मिळण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे दिनांक १९ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्तप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले त्यानूसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.
जालना येथील जिल्हा स्त्री व बालरुग्णालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट- अ च्या १३ मंजूर पदांपैकी १२ पदे भरलेली असून १ पद रिक्त आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.
रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात सिंचनाचे सुविधेपासून शेतकरी वर्ग वंचित असल्याबाबत**

**(३९) ४८५९० (२९-०४-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात सिंचन विभागाने सात कोल्हापूरी बंधारे बांधकामास २६ लक्ष व दुरुस्ती करीता २१ लक्ष, देण्यात आले असून सिरंकोंडा तलावाचे बांधकामास ७ लक्ष दुरुस्ती करीता खर्च करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील सिंचन व्यवस्था बरोबर नसल्याने शेतकरी वर्ग सिंचनाचे सुविधांपासुन वंचित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, येथे सिंचन सुविधा पूरविण्यास विभागाने काय उपाययोजना आखल्या आहेत,

(४) असल्यास, याला जबाबदार असणारे अधिकारी वर्गावर काय कारवाई करण्यात आली,
(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सिरोंचा तालुक्यात सिंचन विभागाने सात कोल्हापूरी पध्दतीचे बंधाऱ्यांचे बांधकाम घेतलेली होती. सदर कामावर एकूण रुपये ९७.२२ लक्ष खर्च झालेला आहे. सन २०१५ मध्ये ३ बंधारे दुरुस्तीकरिता रुपये १७.०० लक्ष तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी सिरंकोडा तलाव बांधकाम नसून बंधारा दुरुस्ती करीता रुपये ७.०० लक्ष ची तरतुद करण्यात आलेली होती व सदर काम पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यामुळ सिरोंचा तालुक्यात सिंचनापासून शेतकरी वंचित राहिलेला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील शालिमार सुपरस्पेशालिस्ट संदर्भ सेवा रुग्णालयात खाटांची संख्या वाढविण्याची मागणी**

**(४०) ४८७९७ (११-०५-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहराची लोकसंख्या पाहता रुग्णांना चांगली आरोग्य सुविधा मिळण्याकरिता शासनाने शालीमार येथे सुपरस्पेशालिटी संदर्भ सेवा रुग्णालय सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयात फक्त १०० खाटा असल्याने अनेक रुग्णांना उपचाराअभावी प्राणही गमवावे लागले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णालयात खाटांची संख्या वाढविण्याची मागणी रुग्णालय प्रशासनाने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रुग्णालयात खाटांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

---

**नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात यंत्रसामुग्री व प्रशिक्षित तंत्रज्ञ पुरविण्यासंदर्भात**

**(४१) ४८८०६ (११-०५-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात उपकरणे कमी असून शिशूंची संख्या जास्त असल्यामुळे शिशुंना संसर्ग होण्याचा धोका वाढला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच रुग्णालयात सिटी स्कॅन मशिन व एमआरआय मशिन नसल्यामुळे येथील रुग्णांना खाजगी रुग्णालयत जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णालयात आवश्यक ती यंत्रसामुग्री व प्रशिक्षित तंत्रज्ञ पुरविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. नवजात शिशुचे विशेष काळजी कक्षामध्ये १८ वॉर्मर बसविण्यात आलेले असल्यामुळे एका वॉर्मरवर ३ ते ४ शिशुंना ठेवावे लागते. तथापि शिशुंना जंतू संसर्ग होवू नये याची रुग्णालयाकडून विशेष काळजी घेतली जाते.
(२) हे ही अंशत: खरे आहे. सद्य:स्थितीत जिल्हा शासकीय रुग्णालयात सी.टी.स्कॅन व एम.आर.आय. मशीन उपलब्ध नाही. सी.टी.स्कॅन चाचणीची आवश्यकता भासल्यास नाशिक शहरातील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथे रुग्णांना पाठवून चाचण्या करुन घेतल्या जातात. एम.आर.आय. चाचणीची आवश्यक्ता असणाऱ्या रुग्णांना जे.जे. रुग्णालय, मुंबई येथे संदर्भित करण्यात येते. तथापि, रुग्ण मुंबई येथे जाण्यापेक्षा खाजगी एम.आर.आय. सेंटर मधून सदर चाचणी करुन घेण्यास इच्छुक असतात.
(३) सी.टी.स्कॅन मशीनची खरेदी जिल्हा वार्षिक योजनेमधून करण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांचे स्तरावर सुरु आहे. तसेच प्रशिक्षित तंत्रज्ञांची पदे भरलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे साखरखेडा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील ग्रामीण रुग्णालय सुरु न झाल्याबाबत**

**(४२) ४९१६७ (११-०५-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे साखरखेडा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलडाणा) येथील ग्रामीण रुग्णालयाला मंजूरी मिळून आठ वर्षाचा कालावधी लोटला तरी अद्यापी ग्रामीण रुग्णालय सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साखरखेडा येथे ग्रामीण रुग्णालयासाठी ग्रामपंचायतीने गावठान मधील दोन एकर जमीन रुग्णालयासाठी देण्याचा ठराव मंजूर करुन सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता देखील केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सिंदखेडराजा हा विस्ताराने मोठा तालुका असून लोकसंख्येच्या तुलनेत आरोग्य सुविधा मिळत नसल्याने येथील नागरिकांची फारच गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, साखरखेर्डा येथे ग्रामीण रुग्णालयाच्या निर्मितीस विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(६) तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. सिंदखेड राजा या तालुक्याच्या ठिकाणी ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित आहे. साखरखेर्डा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. तसेच ग्रामीण रुग्णालय, देऊळगाव राजा, देऊळगाव मही, मेहकर, बीबी व लोणार या सर्व ठिकाणी रुग्णांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
(४) भूमी अभिलेख कार्यालयाकडून विहित पध्दतीने जमीनीची मोजणी होऊन जागा ताब्यात आल्यावर रुग्णालय बांधकाम करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हा रुग्णालय नेत्र विभागातील दुरावस्थेबाबत**

**(४३) ४९२६८ (११-०५-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरातील जिल्हा रुग्णालयात (नेत्र) काच बिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी सुविधा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच रुग्णालय परिसरात मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य आहे व परिसरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नेत्र रुग्णालयात सर्व प्रकारची शस्त्रक्रिया करण्याबाबत तसेच इतर सोयी सुविधा रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
परभणी जिल्हा रुग्णालयातील नेत्र विभागात काचबिंदुच्या Open Angle Glaucoma या प्रकाराच्या आजारावर वैद्यकीय उपचार उपलब्ध करुन Close Angle Glaucoma प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध नाही.
(२) हे खरे नाही.
(३) या रुग्णालयात मोतिबिंदु शस्त्रक्रिया, शालेय विद्यार्थी आणि ४० वर्ष वयाच्या वरील व्यक्तीची दृष्टीदोष तपासणी तसेच Pterigium, Chalazion, Style आणि F.B.Removol या शस्त्रक्रिया केल्या जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धाड (ता.जि.बुलढाणा) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक व वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत**

**(४४) ४९३३१ (११-०५-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा तालुक्यातील धाड येथील ग्रामीण रुग्णालयात २ वर्षापासून वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी नसल्याने अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आले वा येत आहे,

(३) अद्यापपर्यंत कुठलीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०९-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.

सामान्य रुग्णालय बुलढाणा येथील वैद्यकीय अधिकाऱ्यास ग्रामीण रुग्णालय, धाड येथील वैद्यकीय अधीक्षक पदाचा कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच एक वैद्यकीय अधिकारी यांना ग्रामीण रुगणालय, चुरणी येथे प्रतिनियुक्तीवर पाठविले आहे. इतर पदांवर दोन बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. आयुष अंतर्गत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध असल्याने त्यांच्या सेवा रुग्णांना मिळत आहे.

(२) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वनशास्त्र पदविधारकांना वन विभागातील गट अ, ब व क पद भरतीत आरक्षण देण्यासाठी वनशास्त्र वनविधारकांना कडून आंदोलन करण्यात आल्याबाबत**

**(४५) ४९३६३ (०७-०५-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वनशास्त्र पदविधारकांना वन विभागातील गट अ, ब व क पद भरतीत आरक्षण देण्यासाठी वनशास्त्र वनविधारकांन कडून आंदोलन करण्यात आल्याचे माहे जानेवारी २०१६ च्या शेवटचा आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनशास्त्र पदविधारकांना वन विभागातील पदभरती संधी देण्यासाठी आरक्षणाची निर्मिती करण्यात येणार काय,

(३) असल्यास, वन विभागाकडुन आरक्षण निर्मीतीकरात कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०८-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) होय, वनक्षेत्रपाल, गट-ब राजपत्रित या संवर्गाच्या सेवाप्रवेश नियम दि.५.२.२०१५ रोजी विहित करण्यात आले असून, यानुसार वनशास्त्र पदवीधारकानसाठी ५ टक्के जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील अढ्याळ ग्रामीण रुग्णालयात अपुऱ्या सोयीसुविधांबाबत**

**(४६) ४९४३३ (११-०५-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील अढ्याळ हे २० हजार लोकसंख्येचे सर्वात मोठे गाव असून २००५ मध्ये येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात झाले व १ कोटी पेक्षा अधिक निधी खर्च करुन सुसज्ज व सर्व सोयीयुक्त इमारत बांधण्यात आली मात्र तशाच अपुऱ्या सोयी व सुविधा अद्यापपर्यंत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याचप्रमाणे सदर रुग्णालयात पदे रिक्त असल्याने रुग्णांचे हाल होत असूनही याकडे सबंधित प्रशासन दुर्लक्ष करित असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच सदर रुग्णालयात पदे रिक्त असताही तेथील दोन कर्मचारी हे भंडारा येथील सामान्य रुग्णालयात काम करित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालयातील सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करित आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही. ग्रामीण रुग्णाल, अड्याळ येथे सर्व सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तेथे येणाऱ्या रुग्णांवर आवश्यकतेनुसार उपचार व औषधोपचार करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही. रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून वैद्यकीय अधिकाऱ्यांची सर्व मंजूर पदे भरलेली आहेत. कर्मचाऱ्यांची काही पदे रिक्त असली तरी उपलब्ध असलेले कर्मचारी रुग्णांच्या सेवेत कुठल्याही प्रकारची गैरसोस किंवा हयगय होऊ देत नाहीत.
(३) होय, हे खरे आहे. सामान्य रुग्णालय भंडारा येथील रक्त पेढी करिता तंत्रज्ञ कमी असल्याने प्रयोगशाळा तंत्रज्ञाची सेवा तेथे संलग्नीत केलेली आहे. दुसरा कर्मचारी, कक्षसेवक याच्या वारंवार तक्रारी येत असल्याने कार्यमुक्त करुन सामान्य रुग्णालय, भंडारा येथे पाठविलेले आहे.
(४) रुग्णांना ग्रामीण रुग्णालय, अड्याळ येथे उपलब्ध असलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सर्व आरोग्य सुविधा व औषधोपचार दिले जात आहेत. रुग्णांचे कोणत्याही प्रकारे हाल होऊ नये याची काळजी घेतली जात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किन्ही नं. (ता.केळापुर, जि.यवतमाळ) शिवारात धरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४७) ४९६०४ (०५-०५-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्ही न. (ता.केळापुर, जि.यवतमाळ) येथील बीट क्रं ८१ घोडदरा वर्तुळ उमरी परीक्षेत्र पांढरकवडा शिवारामध्ये जि.प. सिचंन विभागाने सन १९७९ मध्ये रो.ह.यो. मार्फत धरणाचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु सन १९८१ ला वनहक्क कायदा बदलामुळे संबधित धरणाचे काम अपूर्णावस्थेत राहील्याने त्याभागात जनतेला पाणी न मिळाल्यामुळे दुष्काळ असल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपूर्णावस्थेत असलेल्या धरणाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी वन जमीन हस्तांतर होणेचे दृष्टीने वन जमीन संपदान प्रस्ताव केंद्र शासनाने फेटाळला असल्याने सुधारित प्रस्ताव फेरसादर करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद सिंचन विभाग, यवतमाळ यांचेकडे सुरु आहे.

(३) वन जमीन हस्तांतरीत न झाल्याने विलंब झाला आहे.

---

**भातकुली-अमरावती तालुक्याच्या गावांना नाला सरळीकरण, सिमेंट पिचिग करणे, फाळीत बांधकाम करणे व इतर विकास कामे करण्याबाबतचे आदेश**

**(४८) ४९६२० (२९-०४-२०१६). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली-अमरावती तालुक्याच्या गावांना नाला सरळीकरण, सिमेंट पिचिग करणे, फाळीत बांधकाम करणे व इतर विकास कामे करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी संबंधितांना आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भातकुली तालुका खारपाणपट्टा क्षेत्र आहे, त्यामुळे अकोला जिल्ह्याचे धर्तीवर नाल्यावर बंधारे बांधण्याची मागणी झाली आहे त्याप्रमाणे कामे होणार आहे काय,

(३) असल्यास, भातकुली तालुका खारपाणपट्टा क्षेत्र शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी लोकप्रतिनिधींची मागणी केल्याप्रमाणे शासन लाभाच्या योजना मंजूर करणार काय

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

तथापि, याबाबत पालक मंत्री, अमरावती जिल्हा यांचे पत्र कार्यकारी अभियंता, लघुसिंचन जलसंधारण विभाग, अमरावती यांना प्राप्त झाले आहे.

(२) व (३) होय.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत भातकुली तालुक्यातील खारपाण पट्ट्यातील क्षेत्रावर सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये मौजे विर्शि, वडली-१,२,३ बोरखडी-१,२ व म्हैसपूर- १,२ या गावांमध्ये एकूण ८ साठवण बंधाऱ्यांची कामे प्रगतिपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आयुर्वेदाच्या बी.एम.एस. च्या अभ्यासक्रमातून पुत्रप्राप्ती, चातुर्वर्णाचा प्रचार व उपाय सुचविले जात असल्याबाबत

**(४९) ५३९२४ (२२-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विलासराव जगताप (जत), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आयुर्वेदाच्या बी.एम.एस. च्या अभ्यासक्रमातून पुत्रप्राप्ती, चातुर्वर्णचा प्रचार व उपाय सुचविले जात असल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभ्यासक्रमातून पुत्रप्राप्तीसाठी ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र स्त्रीने करावयाच्या वेगवेगळ्या विधीचे उपाय सुचविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकिय अभ्यासाप्रमाणेच एकाच वेळी गर्भलिंग निदान प्रतिबंधक तसेच अंधश्रद्धा निर्मुलन कायद्याचा भंग झाल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अभ्यासक्रमाची व पाठ्यक्रमाची तपासणी करून योग्य ते बदल तसेच आक्षेपार्ह लेखाबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-११-२०१६)** :(१) हे खरे नाही. अभ्यासक्रमात पुत्रप्राप्ती व चातुर्वर्णाबाबत समावेश नाही. परंतू, दिनांक ०६ जानेवारी, २०१६ रोजीच्या "लोकसत्ता" या वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाल्याचे दिसून येते.
(२) व (३) हे खरे नाही. परंतू, आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमामध्ये PCNDT & MTP Act यांचा समावेश करण्यात आलेला आहे. जेणेकरुन, विद्यार्थ्यांना संबंधित कायद्याविषयी संपूर्ण ज्ञान प्राप्त व्हावे. तसेच, त्यांच्याकडून कोणत्याही चुका होऊ नयेत. त्यामुळे आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमामुळे गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा व अंधश्रध्दा निर्मुलन कायद्याचा कोणताही भंग होत नाही.
(४) आयुर्वेद अभ्यासक्रम हा भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली यांनी ठरविलेला असल्याने त्याबाबत कोणताही बदल करण्याचा अधिकार फक्त उक्त परिषदेलाच आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या दिनांक ३१/०५/२०१६ रोजी पत्रान्वये आयुर्वेद अभ्यासक्रमातील पुसंवन विधीचा पुन:विचार करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुरखेडा वन आगारात (जि.चंद्रपूर) आग लागल्याबाबत

**(५०) ६२७४९ (२८-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरखेडा वन आगारात (जि.चंद्रपूर) तीन ते चार हजार जळाऊ बिट तसेच मोठ्या प्रमाणात इमारती लाकूड फाट्याला दिनांक १७ मे, २०१६ रोजी च्या सुमारास आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आग लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या आगीत किती वित्त हानी झाली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-११-२०१६) :**(१) कुरखेडा जि.गडचिरोली वन आगारात दिनांक १४.५.२०१६ रोजी आग लागली असून, त्यात २८.८५ जलावू बिटे जळालेली आहेत व इमारती मालाचे काहीही नुकसान झालेले नाही.

(२) आग अकस्मात लागलेली असून, आगीबाबत पोलीस स्टेशन, कुरखेडा येथे दिनांक १५.५.२०१६ रोजी लेखी तक्रार दाखल दिलेली आहे.

(३) बिटाचे निर्धारीत किंमतीनुसार २८.८५ जलावू बिटाची किंमत रु.८२२५१/- एवढी वित्त हानी झालेली आहे. परंतु सदर जलावू बिटाचा विमा काढण्यात आलेला असून, नुकसान भरपाईबाबतचा दावा विमा कंपनीकडे करण्यात आलेला आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.